# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.02.2026** **वार- सोमवार**

---

**महापौर**

पुण्याच्या महापौरपदी भाजपच्या मंजुषा नागपुरे यांची तर उपमहापौर पदी रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज सकाळी महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार सुरेश कलमाडी, माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचं निधन झाल्यानं ही निवडणूक बिनविरोध करून श्रद्धांजली सभेसाठी सर्वांनी वेळ द्यावा असं आवाहन महापालिकेचे गटनेते गणेश बिडकर यांनी विरोधी पक्षांना केलं. त्यानुसार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने महापौर आणि उपमहापौर पदासाठी दाखल केलेले उमेदवारी अर्ज मागे घेतले. यानंतर जिल्हाधिकारी आणि पिठासीन अधिकारी जितेंद्र डुडी यांनी नागपुरे आणि वाडेकर यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली.

सलग तिसऱ्यांदा विजयी झालेल्या नागपुरे या 2012 च्या महापालिका निवडणुकीत पहिल्यांदा पुणे महापालिकेवर नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या.

महापौर आणि उपमहापौर निवडीनंतर महापालिकेच्या सभागृहात दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या कार्याचं, राजकीय आणि सामाजिक योगदानाचं स्मरण करण्यात आलं .

**तैलचित्र**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृती पुणे महापालिकेत कायमस्वरूपी राहाव्या , या उद्देशानं सभागृह नेते गणेश बिडकर यांच्या वतीने पुणे महानगरपालिकेला अजित पवार यांचं तैलचित्र भेट देण्यात आले. महाराष्ट्र राज्य कला पुरस्कार विजेता अमित ढाणे यांनी हे तैलचित्र साकारलं आहे.

**महापौर**

महापौर पदाच्या शुभेच्छा देताना हार, पुष्पगुच्छ किंवा अन्य भेटवस्तूंऐवजी महानगरपालिकेच्या शाळांमधल्या विद्यार्थ्यांना उपयुक्त शालेय साहित्य द्यावं असं आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी केलं आहे. औपचारिक शुभेच्छांऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संदेश असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं .

**जिल्हापरिषद**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडलं होतं. आज या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत पुणे जिल्हा परिषदेच्या ७३ गटांसाठी २९९ तर १३ पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी ५२८ उमदेवार रिंगणात होते. पुणे जिल्हा परिषदेत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसनं एकहाती सत्ता मिळवली आहे. 47 जागांवर विजय मिळवत बहुमताचा आकडा पार केला आहे.भाजप 9 , शिवसेना- 4, शरद पवार गट 1, तर ठाकरे गटाला 6 जागा मिळाल्या असून काँग्रेस आणि अपक्षाला एकही जागा मिळवता आली नाही.

**इयत्ता१२वीपरीक्षा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या वतीनं आयोजित इयत्ता 12 वीची परीक्षा उद्यापासून सुरू होत आहे.

या परीक्षेसाठी एकंदर १०,हजार 664 कनिष्ठ महाविद्यालयांमधून 15 लाख 32 हजार 487 विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी 3 हजार 387 मुख्य केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. प्रचलित पध्दतीप्रमाणे माहिती तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या दोन विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाणार आहे.

**रब्बी हंगामा**

केंद्र सरकारने यंदाच्या रब्बी हंगामासाठी राज्याला 31 लाख 35 हजार मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर केला असून ,खतांची मुबलकता असल्याची माहिती कृषी विभागाचे संचालक अशोक किरनळ्ळी यांनी दिली. त्यामुळे शेतकऱ्यांना खतांच्या उपलब्धतेची कोणतीही अडचण नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. गेल्या 3 वर्षांच्या तुलनेत यंदाचा मंजूर झालेला कोटा सर्वाधिक आहे.

**राजमाता जिजाऊ बस**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच राजमाता जिजाऊ नावानं नव्या बस दाखल होत आहेत. 3 आणि 2 आसन रचनेच्या 55 आसनी अत्याधुनिक बस मार्च महिन्यापासून टप्याटप्याने राज्यात प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. सध्या धावत असलेल्या बसची आसन क्षमता 40 प्रवासी इतकी आहे. नवीन बसमुळे गर्दीच्या मार्गावर उभे राहणाऱ्या 15 प्रवाशांना आता बसण्याची व्यवस्था उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गावर सुरू करण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे .

**विवाह**

दिव्यांग प्रतिष्ठानच्या वतीनं पुणे जिल्ह्यातल्या दिव्यांग बांधवांच्या विवाहाचं दरवर्षीप्रमाणे आयोजन करण्यात आलं होतं. काल झालेल्या या सोहळ्यात 14 दिव्यांग बांधव विवाहबंधनात अडकले. यावेळी संस्थेच्या वतीनं या जोडप्यांना 32 विवाह उपयोगी साहित्य देण्यात आले. ह भ प नारायण महाराज गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला.

**चेस**

पुण्यातल्या कुंटे चेस अकॅडमीच्या वतीनं आयोजित आंतरशाखा टॅलेंट हंट स्पर्धेत रेटेड गटात पाच गुणांसह कुशल झाडे विजेता ठरला. तर पार्थ बडेकरनं साडेचार गुणांसह दुसरे स्थान मिळवले. ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. स्पर्धेतल्या विजेत्या आणि उपविजेत्या खेळाडूंना करंडक आणि रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात गेल्या काही दिवसांत , दिवसांच्या तापमानात वाढ झाल्याचं दिसून येत आहे. आज कमाल तापमान 33 तर किमान तापमान 13 पुरमांक 8 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या कमाल तापमानात काहीशी घट तर किमान तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार !**